
म. ग्रं. सं, ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. २१३

# भगवान कोणादित्य

## सूर्यक्षेत्र कोणार्क




REFBK-0012199

राष्ट्रगा के
भारत दर्शन

# सांस्कृतिक भारत दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३११८ दि: ...
क्रमांक २०३ आ. दि. ...
REFBK-0012199
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा.क्र. १२१९९



द यात्री

## भगवान् कोणादित्य

### सूर्यक्षेत्र कोणार्क

वोरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

श्री : ३१३ [ ३–६१ ]

© १९६१
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई.


आवृत्ति पहिली : १९६१

किंमत ८० नये पैसे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २.



मुद्रक :
ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८, नारायण पेठ,
पुणें २.



# भगवान् कोणादित्य

## [ सूर्यक्षेत्र कोणार्क ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२१९९

**स्थावर-जंगमांचा आत्मा :**

> चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः ।
> आप्रा द्यावापृथिवी अन्तरिक्षं सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥

" सूर्याचा उदय झाला ! आश्चर्याची गोष्ट अशी कीं, उदय पावतांच यानें अंधकार नाहींसा केला आणि अन्य तेजस्वी पदार्थांचें तेज यानें मलिन केलें ! हा सूर्य प्रकाशकिरणांचा आश्रयभूत आहे. मित्र, वरुण व अग्नि या ( द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथ्वी या तिन्ही स्थानींच्या ) देवतांचा हा नेत्रच होय. आपल्या उदयाबरोबर यानें द्यावा, पृथ्वी आणि अंतरिक्ष यांस परिपूर्ण केलें — व्यापून टाकिलें. सूर्य साऱ्या स्थावर-जंगमांचा अन्तर्यामी आत्माच आहे ! '

अशा भावपूर्ण मंत्रांनीं वेदकाळांत सूर्यदेवाचें स्तवन केलें जात असे; आणि आजहि आपल्या संजीवक प्रकाशानें कणाकणांतील चैतन्यास जाग आणणारें सूर्यबिंब उदयाचलावर पाहिलें कीं, कोटि कोटि मस्तकें त्याच्या वंदनासाठीं विनम्र होत असतात. सूर्यनारायणाची आराधना वेदकालापासून आजपर्यंत अशी अखंडित चालत आली आहे. या आराधनेनेंच मध्य-युगांत उपासनेचें रम्योत्कट रूप धारण केलें आणि तें ठिकठिकाणीं सूर्य-मंदिरांच्या वास्तुशिल्पांतून प्रकट झालें. ओरिसा राज्यांतील पूर्वसमुद्राच्या तीरावर उभारलें गेलेलें कोणार्कचें भव्य सूर्यमंदिरहि त्याच भक्तीचा रमणीय आविष्कार होय.

**पावनपरिसरांकित क्षेत्रस्थान :**

कोणादित्य किंवा कोणार्क क्षेत्राचा परिसर म्हणजे पुराणविख्यात मैत्रेयवनाचा पावन प्रदेश.

**लवणस्योदधेस्तीरे पवित्रे सुमनोहरे।**
**सर्वत्र वालुकाकीर्णे देशे सर्वगुणान्विते ॥**
**आस्ते यत्र स्वयं देवः सहस्रांशुदिवाकरः।**
**कोणादित्य इति ख्यातो भुक्तिमुक्तिफलप्रदः ॥**

हें ब्रह्म पुराणांतील कोणादित्य क्षेत्राचें वर्णन — या परिसराच्या केवळ पावनतेचाच नव्हे, तर मनोहारित्वाचा आणि क्षेत्रदृष्ट्या सर्वगुण-संपन्नतेचाहि निर्देश करतें.

कोणार्क हें भुवनेश्वराच्या आग्नेय दिशेस ४० मैलांवर असून जगन्नाथपुरीहून ईशान्येस अवघ्या २१ मैलांवर आहे. 'चक्रक्षेत्र'—जगन्नाथ-पुरीशीं असलेल्या दिशेच्या अनुबंधा-वरून या 'अर्कक्षेत्रा'स 'कोणस्थ सूर्य' किंवा 'सूर्याचा कोना' या अर्थानें कोणार्क किंवा कोनारक हें नांव प्राप्त झालें असावें.



या मंदिराचा सर्व परिसर रेतीनें व्यापलेला असून येथून समुद्र मैल-दीड मैलावर आहे वास्तविक येथील वालुकामय



प्रदेश केवळ सद्रमुसान्निध्यानेंच निर्माण झालेला नसून तो शुष्क झालेल्या चंद्रभागा नदीच्या पात्राचाहि प्रदेश आहे. ह्या चंद्रभागेच्या पात्रांतून जेव्हां निर्मल, शांत व मधुर जलप्रवाह वाहात असेल, त्या वेळीं सागर-तीरींचा हा क्षेत्रप्रदेश मनोहर तीर्थस्थान म्हणून प्रसिद्धि पावला असेल खास.

क्षेत्राची पूर्वापार पावन परंपरा या परिसरांत आजहि असलेल्या अनेकविध लहान-मोठ्या देवता-मंदिरांवरून देखील सिद्ध होते. खरी गोष्ट अशी कीं, ओरिसा राज्य पूर्वपरंपरेनुसार ज्या पांच धर्मपावन क्षेत्रप्रदेशांत विभागतात, त्या पांचांतील एक म्हणून कोणार्क परिसराची ख्याति आहे. पुरी, भुवनेश्वर महाविनायक आणि जाजपूर या अन्य चार क्षेत्रांच्या बरोबरीनें कोणार्क क्षेत्राची महात्मता मानली जाते.

**पुराणप्रसिद्धि आणि आख्यायिका :**

आजच्या भग्नावशिष्ट स्थितींतहि उत्कलाच्या स्थापत्यकलेचा दिमाख व्यक्त करणारें कोणार्कचें सूर्यमंदिर इसवी सनाच्या तेराव्या शतकांत उभारलेलें आहे. पण पावन सूर्यक्षेत्र या नात्यानें या स्थानाचे विस्तृत निर्देश कपिलसंहिता, ब्रह्मपुराण, भविष्यपुराण, सांबपुराण आणि वराहपुराण यांतून आढळतात. या स्थानास सूर्यक्षेत्र म्हणून महत्त्व प्राप्त करून देणारी आख्यायिकाहि या पुराणग्रंथांतून वर्णिलेली आहे. थोड्याफार फरकानें सर्व ग्रंथांतून एकरूपच असलेली ही आख्यायिका श्रीकृष्णपुत्र सांब याच्या जीवनांतील एका विपरीत घटनेशीं संबद्ध आहे.

श्रीकृष्णपुत्र सांब हा जांबवतीचा मुलगा. अत्यंत रूपवान् म्हणून हा प्रसिद्ध होता. एकदां सांबानें केलेल्या थट्टेनें चिडून जाऊन नारदानें त्यास गोत्यांत घालण्याचें ठरविलें. त्यानें सांबास जेथें कृष्णाच्या अनेक स्त्रिया स्नान करीत होत्या तेथें नेलें. मदनासहि लाजविणारें सांबाचें सौंदर्य पाहून त्या स्त्रिया त्याजवर आसक्त झाल्या. नारदास पाहिजे होती तशी संधि मिळाली. या घटनेची नारदानें श्रीकृष्णाजवळ चहाडी करतांच कृष्णानें संतापून रूपगर्वित सांबास ‘ तुला महारोग होईल ! ’

म्हणून शाप दिला. या शापामुळें गलितकुष्ठाच्या व्याधीनें सांबास ग्रासलें. सांबानें क्षमायाचना केल्यावर या साऱ्याच विपरीत घटनेंतील त्याचा अल्प दोष ध्यानीं घेऊन श्रीकृष्णानें त्यास उश्शाप दिला व व्याधि-शमनार्थ मैत्रेयवनांत जाऊन सूर्योपासना करण्यास सांगितलें. त्यानुसार मैत्रेयवनांत सांबानें उपासना आरंभिली. सूर्याच्या एकवीस नांवांच्या जपाचीं पुरश्चरणें करीत चन्द्रभागेच्या पावक जलानें नित्य स्नान करणाऱ्या सांबास एके दिवशीं नदीच्या प्रवाहाबरोबर वहात आलेल्या कमळांत आपल्या आराध्य सूर्यदेवाची मूर्ति मिळाली. तेव्हां सांबानें तेथें मंदिर बांधून त्यांत ती मूर्ति सुप्रतिष्ठित केली. तिच्या पूजनार्चनानें महारोग बरा झाल्यावर सांब पुन्हा द्वारकेस गेला.

द्वापर युगाशीं संबंध जोडणारी ही कथा आज येथें दिसणाऱ्या मंदिराशीं मुळींच संबंधित नसली तरी हें स्थान फार पुरातन कालापासून सूर्यस्थान मानलें गेलें होतें, या तथ्यावर ती बोट ठेवते. येथें मंदिर-मूर्तीची स्थापना होण्यापूर्वींहि हा प्रदेश मैत्रेयवन अर्थात् सूर्यवन मानला जात असे, हेंहि स्पष्ट होतें.


या मंदिराच्या बांधणीपूर्वी हें स्थान सूर्यक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असल्याचा पुरावा इतिहासास ज्ञात असलेल्या मयूरभट्ट कवीच्या एका आख्यायिकेंतहि मिळतो. इसवी सनाच्या सातव्या शतकांत हर्षवर्धनाच्या कविमंडळांत मानाचें स्थान असलेला हा मयूरभट्ट विख्यात बाणभट्ट कवीचा सासरा. मयूरभट्ट आपली रचना बाणभट्टास दाखवून परिष्कृत करीत असे. एके दिवशीं असेंच एक काव्य रचून तें बाणास दाखविण्याच्या अदम्य उत्कंठेनें फार मोठ्या पहाटेस उठून तो बाणाकडे गेला. त्या वेळीं बाण आपल्या संस्कृतज्ञ प्रियेची संस्कृत पद्यानेंच मनधरणी करीत होता :

**गतप्राया रात्रिः शशिमुखि शशी शीर्यत इव ।**
**प्रदीपोऽयं निद्रावशमुपगतो घूर्णत इव ।**
**प्रणामान्तो मानस्त्यजसि न तथापि क्रुधमहो ।**

... बाणानें पद्याचे हे तीन चरण म्हटले व पुढील पंक्ति तो उच्चारणार तोंच दाराशीं, काव्यानुकूल तंद्रिल मनोवस्थेंत उभ्या असलेल्या मयूरकवीनें चवथा चरण पुरा केला :

कुचप्रत्यासत्त्या हृदयमपि ते चण्डि कठिनम् ॥

मयूरभट्टाच्या या सहजस्फूर्त काव्य-पंक्तींतून नेमका आपल्या मनांतील आशय व्यक्त झाल्याचें पाहून बाणास आनंद झाला खरा, पण श्वशुरजामाताच्या नातेसंबंधामुळें तो अत्यंत ओशाळला. विशेषत: बाणाच्या पत्नीस आपल्या पित्याची शिष्टाचारशून्य व पितृपदाच्या गांभीर्यास न शोभणारी शृंगारोक्ति ऐकून अत्यंत लाज वाटली आणि तिनें संतापून, ' अनार्या, तूं कुष्ठी होशील ' म्हणून पित्यास शाप दिला. असें सांगतात कीं, पतिव्रता पुत्रीच्या शापामुळें रक्तपितीच्या भयानक व्याधीनें ग्रासलेला मयूरभट्टहि याच सूर्यक्षेत्रीं आला आणि येथेंच त्यानें 'सूर्यशतक' रचून, सूर्योपासना करून, व्याधीचा उपशम करून घेतला. मयूरभट्टाचें हें 'सूर्यशतक' भक्तिरसपूर्ण संस्कृत काव्य आहे. या क्षेत्रीं समुद्राचें दर्शन झालें कीं तेथेंच वालुकामय विजन किनाऱ्यावर बसून व्याकुळ वाणीनें सूर्यास आवाहन करणारा मयूर-भट्ट मनासमोर दिसूं लागतो आणि सूर्य-मंडलास द्रव आणणारी त्याची आर्त प्रार्थनाहि जणूं ऐकूं येऊं लागते :



" हे सूर्यनारायणा, या साऱ्या भूतलाचा जन्मदाता तूं आहेस. जीवनांतला सारा रस तूंच आहेस. पशु-पक्षी, मानव आणि वृक्षवेली यांचें तेज तूंच ! तुझ्यामुळेंच ह्यांचें जीवन सुफलित होतें. तुझ्या दर्शनानें अंध-काराचा नाश होतो, सर्व पापांचें भस्म होतें आणि रोगव्याधि आणि मृत्यु यांचें निवारण होतें. हे भगवन्, या भक्ताला तूं पावन कर. "

याप्रमाणें व्याधिशोषण करण्याकरितां शल्यचिकित्सकाच्या कठोर-तेनें, चंडांशूनें आपल्या प्रखर किरणांनीं याच ठिकाणीं सांब-मयूरांचीं कोमल शरीरें भाजून काढलीं आणि येथेंच वत्सल सवित्यानें आपला संजीवक सोनेरी हात मातेच्या ममतेनें त्यांच्या व्याधिजर्जर गलितगात्रां-वरून फिरविला.

## मंदिररचनेचा ऐतिहासिक प्रसंग :

अशा या पुराणपावन क्षेत्राचा भाग्यकाल मयूरभट्टानंतर ६०० वर्षांनीं तेराव्या शतकांत उजाडला. या वेळीं 'गंग' नामक प्रतापी राजवंश उत्कलाच्या राजसिंहासनावर अधिष्ठित झालेला होता. या राजवंशाच्या प्रतापाची गाथा अविस्मरणीय आहे.

जेव्हां उत्तर भारत पूर्ण यवनाक्रांत होऊन दक्षिणेंतहि मुसलमानी आक्रमणांनीं हिंदु शासकांस भयभीत करून सोडलें होतें, त्या वेळींच ओरिसांतील या पराक्रमी राजवंशानें यवनांस प्रभावी टक्कर देऊन आपलें स्वातंत्र्य सुरक्षित राखलें. ज्या कालांत पश्चिम भारतांतील सोमनाथ, नागरकोट यांसारखीं सुंदर मंदिरें यवनांनीं मातींत मिळविलीं, त्याच कालांत उत्कल प्रदेशांत गंगवंशीय नृपसिंहांच्या आश्रयानें वास्तुशिल्पाची सौंदर्यलक्ष्मी ऐश्वर्यानें नटून, पुरी, भुवनेश्वर येथील मनोहर मंदिरांच्या रूपानें दिमाखांत नांदूं लागली. हा काल म्हणजे भारताच्या 'नागर' शिल्पशैलीच्या वैशिष्ट्यपूर्ण 'कलिंग' नामक उपशैलीच्या आविष्काराचा काल होय. उदयगिरी-खंडगिरीच्या गुम्फा-शिल्पापासून लिंगराज-मंदिरापर्यंत विकास पावलेल्या स्थापत्य-शिल्पाच्या अशा परिणत अवस्थेंतच कोणार्कचें सूर्यमंदिर उभारलें गेलें. त्याच्या उभारणीस निमित्तहि तसेंच दिव्योत्कट लाभलें :

इ. सन १२३८ मध्यें राज्यासनावर आलेल्या गंगवंशीय प्रथम नरसिंहदेवानें उत्कलावरील दोन यवनाक्रमणें तर शौर्यानें परतून लावि-लींच, पण आक्रमण हाच स्वसीमेच्या संरक्षणाचा सर्वोत्तम मार्ग, हा राजनैतिक सिद्धान्त अनुसरून स्वसीमेस भिडलेल्या यवन-प्रदेशावर तो स्वत:च चालून गेला. मुस्लिम बंगालच्या सीमेवरील लष्करी ठाण्यावर-काटसिन येथें झालेल्या घनघोर लढाईत मलिक इझुद्दिनाच्या सैनापत्या-खालीं असलेल्या बंगालच्या सुभेदाराच्या सैन्यास ओरिसाच्या हिंदु सेनेनें चांगलीच धूळ चारली. मुसलमानांनीं व्यापलेल्या प्रदेशावर यानंतरहि अशींच वारंवार यशस्वी आक्रमणें करून विश्वविजयी यावनी सामर्थ्याशीं नरसिंहदेवानें घेतलेली झुंज पूर्व भारताच्या इतिहासांतील एक सुवर्णपृष्ठ होय. इस्लामी सत्तेच्या इकडील विस्तारास




यामुळें पायबंद तर बसलाच, पण नरसिंहदेवानें या विजयांतून आपल्या राज्याच्या सीमा विस्तारण्याचें तत्कालदृष्ट्या अपूर्व कार्य साधलें आणि दिग्विजयाच्या याच अपूर्व आनंदास चिरस्मरणीय करण्याचें एक भव्य स्वप्न सम्राट् नरसिंहदेवाच्या श्रद्धाशील अंत:करणांत जागें झालें. विजयप्रसंगाची अपूर्वता आणि नराधिपाच्या स्वप्नाची भव्यता यथार्थ रूपानें साकार करण्यासाठीं ओरिसांतील महान् कलावंतांनीं आपली सारी कला पणास लावली आणि सर्वांगसुंदर अशा उत्तुंग विशाल सूर्यमंदिराच्या स्वरूपांत उत्कलाचा भव्य कीर्तिस्तंभ उभा केला. नरसिंहदेवाच्या या पुण्यकृत्याची नोंद जगन्नाथपुरी येथें कालक्रमानुसार नोंदविलेल्या वृत्तान्तबखरींत मिळते आणि तीस पुष्टि देणारे ताम्रलेखहि उपलब्ध झाले आहेत.

## सूर्यमंदिर :

या कीर्तिमंदिराच्या शिल्पाची मूळ कल्पनाच मोठी दिव्य आणि रमणीय आहे. अत्यंत बलशाली आणि वेगवान् असे सात घोडे जोडं-लेल्या देदीप्यमान रथांतून भगवान् सूर्यनारायण तमोरूप शत्रूस विध्वसून अनंत आकाश आक्रमितो, हीं वैदिक ऋषींची दिव्य कल्पना साकार करून दाखविण्यासाठीं कलावंतांनीं मंदिरास सूर्याच्या अद्भुत आणि कला पूर्ण रथाचेंच स्वरूप दिलें.

आजच्या भग्नावस्थेंतहि मंदिराचें हें रथस्वरूप तत्काळ ध्यानीं येतें. विमान ( गर्भगृह ) आणि जगमोहन ( सभामंडप ) दोन्ही मिळून बनलेला हा भव्य रथ पूर्वाभिमुख असून त्यास दक्षिण आणि उत्तर बाजूस बारा बारा अशीं एकूण चोवीस प्रचंड चाकें आहेत. बारा मास आणि बारा राशि यांतून सूर्यरथ भ्रमण करतो, हेंच जणुं हीं चोवीस चाकें दर्शवितात. हीं राक्षसी चाकें प्रत्येकीं दहा दहा फूट उंचीचीं असून अत्यंत कलापूर्ण आहेत. प्रत्येक चाकास आठ रुंद आणि आठ अरुंद अशा सोळा आरी आहेत. चाकाचा तुंबा, प्रत्येक आर आणि चाकाचा पाट ( चक्रनेमि ) यांवर मनोहर नक्षी कोरलेली असून रुंद आरींच्या चौकटी भागांत व तुंब्याच्या



रथचक्र

मध्यांत वर्तुळांत मानवांच्या आणि अश्वगजादि पशूंच्या लहान पण भाव-सुंदर आकृति खोदलेल्या आहेत.

जगमोहनाच्या पूर्वद्वाराशीं उजव्या बाजूस चार आणि डाव्या बाजूस तीन असे रथाचे सात घोडे प्रचंड रथास पेलून आकाशांत झेप घेत असल्याच्या आविर्भावांत मागील पायांवर खडे होते. त्यांपैकीं कांहीं अजून भग्नावस्थेंताहि आपल्या गति-मानतेची प्रचीति आणून देत आहेत.

जगमोहनाच्या पूर्वद्वारासमोर आज मोकळ्या दिसणाऱ्या जागेंत चौतीस फूट उंचीचा षोडषपृष्ठांचा स्तंभ उभा होता आणि त्यावर सूर्यसारथी अरुण विराजमान झालेला होता. पुरीस जगन्नाथमंदिराच्या पूर्व द्वारासमोर आज तो स्तंभ पहावयास मिळतो. त्यावरील अरुणमूर्ति मात्र तेथें नाहीं.

असें हें भव्य रथमंदिर दुर्दैवानें संपूर्ण स्वरूपांत उरलें नाहीं. मंदिराचें विमानच उद्ध्वस्त झाल्यानें अधिष्ठापित सूर्यमूर्तीचें दर्शन होत नाहीं. रथमंदिराचें केवळ जगमोहन मात्र जवळ जवळ पूर्ण स्वरूपांत पहावयास मिळतें.

उत्तर-मध्ययुगीन उत्कल मंदिरांत सामान्यत: विमान, जगमोहन, नटमंदिर आणि भोगमंदिर असे क्रमश: सलग चार भाग आढळतात. परंतु येथील सूर्यमंदिराचे फक्त दोन भाग — विमान आणि जगमोहन — सलग असून नटमंदिर थोडें अलग, जगमोहनाच्या पूर्वेस तीस फुटांवर बांधलेलें आहे. भोगमंदिर मात्र मुळींच नाहीं. नटमंदिरहि उद्ध्वस्त झालेलें आहे. मंदिराच्या प्रांगणांत आग्नेय बाजूस चंडीचें मंदिर होतें. त्याच्या खुणा मात्र आज दिसतात. कांहींच्या मतें तेथें अतिथिगृह होतें, मंदिर नव्हतें. प्रांगणांतील अन्य अवशिष्ट चिन्हांवरून अन्य देवतांचीं कांहीं छोटीं छोटीं

अनुक्रम ..२९..७..९...... दि: ..१२...५...८०
क्रमांक ....२..



सिंह आणि हत्ती ( कोणार्क )

मंदिरेंहि येथें होतीं असें दिसतें. मुख्य रथमंदिराच्या मागें सूर्यपत्नी संज्ञा हिचेंहि मंदिर दाखवितात.

**भव्यता आणि कलावैभव :**


भग्नप्राय अवस्थेंताहि प्रत्ययास येणारी मंदिराची भव्यता मनुष्यास स्तंभित करून सोडते. मंदिराचें प्रांगणच केवढें विस्तृत आहे ! ८७५ फूट लांब आणि ५४० फूट रुंद अशा या विशाल प्रांगणासभोंवतीं तटबंदी केलेली होती. आणि त्या तटबंदींत पूर्वेस, दक्षिणेस आणि उत्तरेस अशीं तीन महाद्वारें होतीं. यांपैकीं पूर्वेकडील मुख्य महाद्वाराशीं हत्तींचीं गंडस्थळें फोडणारे दोन प्रचंड आणि भयानक महासिंह आजहि दिसतात. खड्‌गधारी योद्धयास सोंडेंत उचलून ओवाळणाऱ्या मस्त हत्तीचें जें भव्य शिल्प येथें पहावयास मिळतें, तसे दोन गजराज उत्तरेकडील प्रवेशद्वारींहोते. योद्धयासह अदम्य रणावेश प्रकट करणारा येथील महाकाय अश्व पाहिला कीं बघणाराचेहि बाहु स्फुरण पावतात. असे दोन घोडे दाक्षिण महाद्वारीं खडे होते. अश्व-गज-सिंहांचीं हीं शिल्पें प्रत्यक्ष सृष्टींत आढळणाऱ्या त्या प्राण्यांहून खूपच मोठीं असल्यानें त्यांची भव्यता प्रांगणाच्या बाहेरच प्रेक्षकाच्या हृदयास भारावून टाकीत असे. भव्यतेबरोबरच या शिल्पांची प्रमाणबद्धता आणि कलात्मक शृंगार आजहि मनास पुरें अंकित करून घेतात.

अखंडित परिपूर्ण अवस्थेंत मंदिराची उत्तुंगता किनाऱ्यापासून दूर अंतरावर समुद्रांत प्रवास करणाऱ्या खलाशांच्याहि नजरेंत भरत असे. प्रत्यक्ष मंदिराच्या प्रांगणांत पदार्पण केल्यावर तर मंदिराची ही उत्तुंग

१२९००

भव्यता प्रेक्षकाच्या पुऱ्या व्यक्तित्वाचाच जणूं ग्रास करून टाकी. आज मात्र ती मोजमापांचा आणि तर्कांचा विषय बनली आहे.

गर्भगृहाचें किंवा विमानाचें शिखर किती उंच असेल? आज याचें अवशिष्ट असलेलें असंख्य शिल्पाकृतींनीं भरलेलें जोतेंच, त्याचे




सूर्यमंदिर (कोणार्क)

दोन्ही बंध मिळून, १५½ फूट उंच आहे. या जोत्यावर वरील चौरसाकृति गर्भगृहाच्या चतुष्कोणी बांधणीचा जो अवशिष्ट 'जंघा' नामक भाग आहे, त्यावरून चतुष्कोणी बांधणीची-गर्भगृहाच्या 'वाड्या'ची-उंची ५८½ फूट असावी. या 'वाड्या'वर ११७ फूट उंचीची 'रेखा' आणि ३६ फूट उंचीचा कलश असावा, असें अनुमान सदृश मंदिरांच्या स्थापत्यप्रमाणांच्या आधारें केलें गेलें आहे. म्हणजे या सूर्यमंदिराच्या श्रीमंदिराची उंची २२७ फूट होती! पुरीच्या जगन्नाथ-मंदिराहूनहि तें उंच होतें! पूर्ण स्थितींत पहावयास मिळणारें जगमोहन आजहि या भव्यतेचा उद्घोष करीत आहे. केवळ जगमोहनच (सभामंडपच) भुवनेश्वराच्या मुख्य लिंगराज-मंदिराहून उंच आहे. लिंगराज-मंदिराची उंची १२७ फूट, तर या सभामंडपाचीच उंची १२९ फूट ८ इंच आहे. १०० फूट लांबी-रुंदीचा हा सभा-

मंडपाहि श्रीमंदिराप्रमाणेंच उंच जोत्यावर आहे. त्याची वरची बांधणी शिखर पद्धतीची नसून एकावर एक रचलेल्या पायऱ्यांच्या पद्धतीची आहे. कलशापर्यंत क्रमाक्रमानें अरुंद आणि निमुळती होत जाणारी ही रचना तीन टप्प्यांची असून प्रत्येक टप्प्यांतून पुढें डोकावणाऱ्या पीठावर पूर्ण उंचीचीं लालित्यपूर्ण मानवाकृति शिल्पें दिसतात. हीं शिल्पें कोणार्क-मंदिराच्या अनेक वैशिष्ट्यांतील मोठें रमणीय वैशिष्ट्य होय. झांज-मृदंगादि संगीत वाद्यें वाजविण्यांत तल्लीन दिसणारीं प्रेक्षणीय शिल्पें पाषाणाचीं असूनाहि अत्यंत जिवंत आणि चैतन्यपूर्ण वाटतात. पार्थिव जडतेचें लयपूर्ण चैतन्यांत परिवर्तन करण्याचें शिल्पकारांचें हें कसब या मंदिरांत साऱ्याच शिल्पाकृतींतून कळसास पोंचल्याचें दिसतें.

मध्ययुगीन मंदिर-शिल्पांतील अतिनिंदित कामशिल्पेंहि या मंदिरांत बहुसंख्येनें पहावयास मिळतात. परंतु त्या शिल्पांतहि रेखीव प्रमाणबद्धता, पाषाणासहि सजीव करणारी लयबद्धता आणि भावपूर्णता शिल्पकारांनीं ओतलेली दिसते. या कामशिल्पांचें सौंदर्य वादातीत असलें, तरी गोपनीय व्यापारांचें हें उघडें आणि प्रचुर प्रदर्शन शिवत्वाची हानि करतें, असेंच वाटतें. पुरी, मदुरा, खजुराहो, इत्यादि ठिकाणींहि अशीं शिल्पें आहेत. विद्युत्पातादि अस्मानी आपत्तींपासून मंदिरास संरक्षण लाभावें म्हणून अशीं शिल्पें कोरलीं जात, असें शास्त्राधारें दाखवितां येतें; पण त्यांचें येथील प्राचुर्य तत्कालीन कलावंतांवर तांत्रिक वामचारी उपासनांचा फारच मोठा पगडा होता हेंच दर्शवीत आहे, असें वाटतें.

आणखी किती तरी भावसुंदर शिल्पचित्रें नट-मंदिरावरहि दिसतात. तीं प्रामुख्यानें नर्तक-नर्तिका व वाद्य-वादक यांचींच असल्यानें हें भोगमंदिर नसून नटमंदिरच असावें, हें ध्यानीं येतें. कलावंतांच्या संजीवक स्पर्शाची जादू अधिक अनुभवण्यासाठीं येथील छोट्या संग्रहालयांतला स्थानभ्रष्ट वेचक शिल्पाचा संग्रह पहावयास हवा. नवग्रहांचें अप्रतिम शिल्प येथेंच पहावयास मिळतें. हें शिल्प मूलतः एका प्रचंड शिळेवर कोरलेलें होतें आणि ती शिळा पूर्व द्वारावर विराजत होती. पण काळाच्या तडाख्यांत ती स्थानभ्रष्ट होऊन तिचें धुळीशीं नातें जडलें. परंतु पन्नास वर्षांपूर्वी पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटची पाषाणरसिकता जागी होऊन ती शिल्पकृति कल-



कत्त्याच्या म्युझियममध्यें हलविण्याचें ठरलें. पण आधुनिक यंत्रयुगांताहि ही प्रचंड शिळा येथून कलकत्त्यास वाहून नेणें सामान्य काम नव्हतें. अखेर मूळ शिळेच्या ज्या पाव हिश्शांत नवग्रहांचें शिल्प होतें, तेवढाच भाग तोडून अलग करण्यांत आला. पण तेवढाहि भाग कलकत्त्यास नेणें न जमल्यानें त्या शिळेवरील फक्त सूर्यमूर्ति कलकत्त्यास पोचूं शकली आणि नवग्रहांच्या या अलग शिळेस येथल्याच संग्रहांत जागा मिळाली. त्या प्रचंड शिळेच्या उरलेल्या खंडाबरोबर आणखीहि किती तरी भग्न शिल्पांनीं मात्र मंदिराच्या प्रांगणांतच वत्सल धरित्रीच्या कुशींत आसरा शोधलेला दिसतो.

## शिल्पांतील विविधता :

अद्वितीय कलात्मकता आणि विस्मयकारी भव्यता एवढेंच या मंदिरशिल्पांचें वैशिष्ट्य नाहीं. शिल्पचित्रणांतील विविधता हेंहि मनोरम वैशिष्ट्य येथें असेंच प्रकर्षानें प्रत्ययास येतें. यांत चतुरंग सेनेच्या अश्वा गजादि अंगांचीं संचलनें आहेत, तुंबळ रणसंग्राम आहेत, हत्ती-घोड्यांच्या पदाघातांनीं आणि वीरांच्या शस्त्रप्रहारांनीं होणारा शत्रुसंहार आहे; विजेत्यांचा उन्माद आहे, जितांकडून सम्राटांनीं केलेला उपहार-स्वीकार आहे, मृगयेंतील अवखळ आनंद आहे, अश्राप भयचकित हरणांची दाणादाण आहे — असे किती तरी अत्यंत गतिमान् आणि ओजःपूर्ण

प्रसंग येथें शिल्पांकित केले आहेत. रूपवतीच्या अंगभंगिमांचें मनोमुग्धकारी लावण्य आहे, नर्तनांतील लास्य-लालित्य आहे, गीत-वादनांतील तन्मयता व लयबद्धता आहे, प्रणयी युगलांचे वेधक विभ्रम-विलास आणि रतिरमणाचे विविध क्रियाकलाप आहेत. यांसारखे आवेगपूर्ण हृदयोत्कट प्रसंग तर येथें विपुलतेनें चितारलेले आहेत. नागकन्या, मत्स्यकन्या, पुराणकथांतील चित्रविचित्र पशुपक्षी, वृक्षवेलींच्या आणि पुष्पपर्णांच्या सांकेतिक सौंदर्याकृति, भूमितींतील विविध आकृतिबंधांवर आधारलेलीं मनोहर विभूषणें आणि रमणीय योजनाचित्रें, यांसारख्या चित्रशिल्पादि कलांच्या उपादानांनीं तर कोनाकोना नटलेला आहे. या साऱ्या विविधतेचा साकल्यानें विचार केला म्हणजे वाटतें, या मंदिराच्या अद्वितीय कलावंतांनीं जेथें जेथें उत्साह-उल्हास आहे, लासविलास आहे, आनंद-आल्हाद आहे, तेथून तेथून जें जें सुंदर, उत्कट वा भव्य आहे, तें तें टिपून घेऊन येथील शिल्पांत साकार केलें आहे.

## शिल्पांच्या जिवंतपणाचें मर्म :

येथें पशु-मानवांच्या शिल्पांतून प्रतीत होणाऱ्या जिवंतपणाचें मर्म कोणतें ? हें शिल्पित पाषाण जडता टाकून देऊन सचेतन झाल्या-सारखे कां वाटतात ? या प्रश्नांचीं नेमकीं उत्तरें देण्यास शिल्पांचा तौलनिक अभ्यास हवा, शिल्पसौंदर्याच्या आस्वादनाचा छंद हवा. पण सामान्य रसिकाच्या भूमिकेंतून कांहीं स्पष्टीकरण देणें शक्य आहे. प्रणयी मिथुनांचीं कामशिल्पें, योद्ध्यासहित घोड्याचें शिल्प अथवा मृदंगवादिकेचें शिल्प यांसारखीं शिल्पें पाहिलीं म्हणजे प्रथम जाणवते त्यांच्या शरीराची लयबद्धता. शरीराच्या वक्र रेषा, त्याचे घनाकार आणि गोलाकार सर्व अधिक तीव्रतेनें दर्शविलेले दिसतात. रेषा अधिक वक्र, घन अधिक सघन आणि गोल अधिक गोलाकार दाखविल्यानें शरीराचें आकार शरीराचे न वाटतां लयीचे आकार वाटतात. मिथुन-शिल्पांतील

युवतींचे कटिप्रदेश व स्तनप्रदेश यांची वक्रता नि सघनता, वादिकांची हनुवटी, मान आणि हातपाय यांनीं साधलेले कोन आणि त्यांची लक्षणीय वक्रता यांमध्यें या लयतत्त्वाची जाणीव प्रकर्षानें होते.



वाद्यवादिका

या लयाकारांबरोबरच शिल्प-शरीरांच्या तोल-रेषेची विशेषताहि ध्यानीं घ्यावयास हवी. सामान्यत: स्थिर शरीराची तोलरेषा पायांत सामावलेली असते. दोन पाय जवळजवळ घेऊन पूर्ण टेकवलेले ज्या मूर्तींतून दाखवितात, त्या मूर्ति स्थिर आणि जड वाटतात. पण येथील नर्तिका काय किंवा वाद्यवादिका काय, त्यांच्या शरीराच्या तोलरेषा पायांत नव्हे तर मोकळ्या अवकाशांत पडल्यानें त्यांचीं शरीरें क्रियावान्, गतिमान् वाटतात. घोड्यासारख्या चतुष्पादांच्या शरीराचा तोल जेव्हां चारी पायांच्या मध्यांत लंबरेषेनें साधलेला असतो, तेव्हां ते जड, निर्जीव वाटतात. पण ती तोलरेषा कलती झाली, पुढें वा मागें सरकली कीं जडताहि जिवंत होऊं लागते. लय-तोलांची एवढीच विशेषता शिल्प प्राणवान् होण्यास-गतिमान् भासण्यास पुरेशी नसते. जिवंत प्राण्याच्या गतिमान् अवस्थतें एका क्षणाची स्थिति आणि दुसऱ्या क्षणाची स्थिति यांत महदंतर असतें. हें महदंतर ज्यामुळें पडतें, तो एका क्षणाच्या स्थितींतून दुसऱ्या क्षणाच्या स्थितींत जातांना होणारा प्रत्येक बदल नेमका पकडून शिल्पकार त्यास

ठळक दृश्यरूप देतो. येथेंच कलावंताच्या कलेची कसोटी लागते. गतिवंताची केवळ क्षणावरुद्ध स्थिति रेखिल्यानें शिल्प जिवंत होत नाहीं. खरें म्हणजे क्षणावरुद्ध 'स्थिती'ऐवजीं क्षणावरुद्ध 'गति' रेखणें जर साधलें, तरच शिल्प प्राणवान् बनतें. कोणार्क येथील शिल्पें जिवंत वाटतात तीं लय-तोल आणि गति यांच्या अशा कौशल्यपूर्ण प्रदर्शनामुळेंच !

**थोडें स्थापत्याविषयीं :**

कोणार्कचें शिल्पसौंदर्य असें आस्वादितांना कलावंतांच्या दिव्य-कलेचें कांहींसें आकलन होतें खरें, पण याच संदर्भात तत्कालीन स्थापत्य-विशारदांचें नैपुण्य आणि क्षमता मात्र मनास अनाकलनीय वाटतात. ना गांव ना शीव असा विजन प्रदेश, त्यामुळें वाहतुकीच्या साधनांचा अभाव, रेतीची भुसभुशीत जमीन, मंदिरास आवश्यक अशा पाषाणांचा नजिकच्या परिसरांत पूर्ण अभाव – अशा प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं एवढें भव्योत्तुंग मंदिर उभारलें कसें, याचें मोठें नवल वाटतें. असें सांगतात कीं, सतत सोळा वर्षें बारा हजार कलावंत आणि कामगार हें मंदिर बांधण्यासाठीं खपत होते. ऐने अकबरीची साक्ष आहे कीं, या मंदिराच्या उभारणीसाठीं नरसिंहदेवानें बारा वर्षांचा महसूल खर्चीं घातला होता. म्हणजे छत्तीस कोटि रुपयांची संपत्ति राजानें या मंदिराच्या कामीं लावली होती. हें सर्व ध्यानीं घेऊनहि कांहीं गूढें शिल्लक रहातातच !

गर्भगृहाच्या शिखररेखेवरील कलश दोन हजार टन वजनाचा होता, असें म्हणतात. सुमारें दोनशें फूट उंचीवर हा कलश कसा बरें स्थानापन्न केला असेल ? मंदिराच्या वास्तुरचनेंतहि ज्या प्रचंड शिळा योजलेल्या दिसतात, त्या इतक्या उंचीवर सुरक्षितपणें कशा चढविल्या असतील ? पस्तीस-पस्तीस फूट लांबीच्या जाड जाड लोखंडी तुळया मंदिराच्या बांधणींत योजलेल्या दिसतात. समुद्राच्या सान्निध्यांत खाऱ्या हवेंतहि गंज न धरणाऱ्या या तुळया कोठें कशा ओतल्या जात असतील ? तेराव्या शतकांत हीं अशीं प्रचंड कामें सिद्धीस नेऊं शकणाऱ्या भारतीय थापत्यशास्त्राचा आपण विचार करूं लागलों कीं, मन विस्मयचकित होतें.

हें सूर्यमंदिर मंदिर-स्थापत्याच्या 'नागर' शैलींत मोडतें. तिच्या 'कलिंग' नामक उपशैलीचाच, उत्कलांतील अन्य प्रसिद्ध मंदिरांप्रमाणें, या मंदिराच्या स्थापत्यांत उपयोग केलेला होता.

अनेक उपशिखरांच्या दृढ आधारानें साधलेलें मुख्य शिखराचें-शिखर-रेखेचें-कलापूर्ण स्थापत्य हें 'नागर' शैलीचें एक प्रधान वैशिष्ट्य. कलिंग' नामक उपशैलींत त्या वैशिष्ट्यास अधिक लालित्य प्राप्त झालें. बुंदेलखंडांतल्या खजुराहोचें कंदरिया मंदिर 'नागर' शैलीचें; तर त्याचेंच समकालीन असें भुवनेश्वर येथील लिंगराज-मंदिर 'कलिंग' शैलीचें. या दोन मंदिरांच्या स्थापत्याची तुलना केली कीं 'कलिंग' शैलीची मनोहरता ध्यानीं येते. 'नागर' शैलींत मुख्य शिखराचें स्थापत्य ठाशीव उठून दिसणाऱ्या उपशिखरांनीं साधलेलें दिसतें, तर 'कलिंग' शैलींत तीं उपशिखरें स्वतंत्र उठून न दिसतां मुख्य शिखराच्या रचनेशीं अधिक संवाद राखून शिखररेखेच्या भिंतींत मिळून गेलेलीं दिसतात. कोणार्कचें भव्य मंदिर ललित 'कलिंग' शैलीचें मनोहर उदाहरण होतें.



मंदिराचें समग्र स्थापत्यसौंदर्य आज दुर्दैवामुळें पहावयास मिळत नाहीं. पण पाश्चात्य पंडित पर्सी ब्राऊन यांनीं हें भग्न मंदिर पाहून तर्कानुमानाच्या साहाय्यानें संपूर्ण मंदिराचें तयार केलेलें चित्र पाहिलें म्हणजे त्याच्या संकलित स्थापत्यसौंदर्याची कल्पना येते.

स्थापत्य-विचाराच्या संदर्भांतच एका कुत्सित कल्पनेचा विचार करावयास हवा. या मंदिराच्या भग्न पसाऱ्यांतच कळसासाठीं घडविलेल्या

कांहीं विशाल शिल्पशिळा त्यांजवरील शिल्पास धक्काहि न लागतां अभंग असल्याचें पाहून पर्सी ब्राऊनसारखे कांहीं लोक हें मंदिर कलशापर्यंत कधींच पूर्ण झालें नव्हतें, अशी कल्पना मांडतात. या शिळा वरून कोसळलेल्या असत्या तर अशा सुरक्षित राहत्या ना. त्या घडविल्या गेल्या पण वर चढविण्यापूर्वीच मंदिराचा पाया खचूं लागला, त्या तशाच पडून राहिल्या आणि मंदिरहि तसेंच अपूर्ण राहिलें, – असें यांचें म्हणणें. पण ज्यांवर हें तर्कानुमान रचलेलें आहे, त्या प्रकारच्या शिल्पशिळा तर भुवनेश्वरीं परिपूर्ण झालेल्या मंदिरांच्याहि प्रांगणांत दिसतात. म्हणजे अशा शिळा जास्त घडविलेल्या अथवा घडणीच्या तांत्रिक दोषानें त्याज्य ठरलेल्या असणेंच संभवनीय वाटतें. त्यांच्या पायथ्याशीं असलेल्या सुरक्षित अस्तित्वावरून मंदिरच अपूर्ण राहिलें म्हणणें युक्तिसंगत दिसत नाहीं. बरें मंदिराचा पाया खचला होता म्हणावें, तर आजच्या भग्नप्राय स्थितींतहि तशीं चिन्हें दिसत नाहींत. तेव्हां मंदिराच्या अपूर्णतेची कल्पना निश्चित त्याज्य ठरते. मंदिराच्या पूर्णतेचीं अन्य प्रमाणें या संबंधांत शंकेस जागाच उरूं देत नाहींत. ओरिसांतील मंदिरांच्या स्थापत्यरचनेंत आधीं विमान, नंतर जगमोहन आणि त्यानंतर नटमंदिर व भोगमंदिर असा बांधणीच्या पूर्णतेचा क्रम दिसतो. विमान परिपूर्ण झाल्यावरच जगमोहनाची बांधणी पूर्ण व्हावयाची. हा क्रम कोणार्क-मंदिरापुरताच बदलला होता, असें कोणत्या आधारावर समजावयाचें ? तेव्हां कोणार्कचें जगमोहन जर परिपूर्ण आहे, तर विमान पूर्ण झालेंच असलें पाहिजे हें निश्चित. इ. स. १२७८ नंतर होऊन गेलेल्या वाचस्पति मिश्रानें 'तीर्थचिंतामणि' ग्रंथांत कोणार्क येथील सूर्यपूजेची पद्धति सांगितली आहे, तीवरून आणि पुरीस ठेविलेल्या पारंपरिक नोंदणीच्या बखर-वृत्तान्तावरून हें सूर्यमंदिर पूर्ण होऊन त्यांत सूर्यमूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली होती, असें निःसंशय ठरतें.

– मंदिराच्या पूर्णतेशीं संबंधित असलेली एक करुण दंतकथा येथेंच सांगावयास हवी.

## धर्मपालाचें आत्मबलिदान :

रथमंदिराचें अद्वितीय काम संपत आलें. गर्भगृहाचें उत्तुंग शिखरहि बांधून झालें. जगमोहन व नटमंदिर यांच्या बांधणीची सिद्धताहि परिपूर्ण झाली. आतां गर्भगृहावर फक्त कलश चढविला कीं एक भव्य स्वप्न परिपूर्ण रूपांत सत्यसृष्टींत अवतरणार होतें.

पण या प्रचंड उद्योगाचें घोडें नेमकें तेथेंच अडून बसलें होतें. या उत्तुंग मंदिरावरचा कलशहि तितकाच प्रचंड आणि अवजड होता. तो मंदिरावर चढविण्याचे सारे उपाय निष्फळ झाले होते. मुख्य स्थपति बिसु महाराणा याची मति गुंग झाली होती. बारा हजार कामगार कलावंत होते, पण कोणासच कांहीं मार्ग सुचत नव्हता. बिसु महाराणा तर अन्नपाण्याची शुद्ध विसरला होता. एवढ्यांत मंदिराच्या आवारांत एक बारा वर्षांचा मुलगा बोरें विकण्यास आला. बोरें विलक्षण चवदार होतीं. त्यांची आगळी रुचि ध्यानीं घेऊन एका कलावंतानें आपल्या मुख्य स्थपतीस दोन बोरें खाण्यास मोठ्या कळकळीनें विनविलें. त्याच्या आस्थेचा अनादर न करविल्यानें बिसु महाराण्यानें एक बोर खाल्लें



तें खाल्लें मात्र आणि त्याची सारी अन्तश्चेतना चाळवली. आपल्या घरच्या बोरीचेंच हें फळ आहे असें खात्रीनें वाटून त्यास आश्चर्य वाटलें ! शतावधि मैलांच्या अंतरावर हीं बोरें आलीं कशीं ? तो उठून बोरें विकणाऱ्या मुलाकडे निघाला. " स्थपति बिसु महाराणा येताहेत, बिसु महाराणा येताहेत ! " हीं कामगारांचीं बोलणीं ऐकून बोरें विकणारा मुलगा तत्काळ उभा राहिला आणि उत्कंठित नेत्रांनीं समोर पाहूं लागला. बिसु महाराणा मुलाजवळ येऊन पोंचला. दोघांची नजर जुळली आणि त्याच क्षणीं मुलानें 'बाबा !' अशी आवेगपूर्ण हाक मारून बिसु महाराण्याच्या पायांस मिठी घातली.

२२१९९

‘ बाळ ? ... धर्मपाल ? ’ — हे शब्द आश्चर्यानें उच्चारीत बिसु महाराण्यानें आपल्या मुलास छातीशीं कवटाळलें ! —

‘ बारा वर्षांपूर्वी याच मुलाच्या जन्मशकुनानें आपणांस मुख्य स्थपतीची सन्मानाची जागा मिळाली, तेव्हां मुलाचें नांव ‘धर्मपाल’ ठेव, असें सद्य:प्रसूत पत्नीस सांगून आपण घर सोडलें, ’ — तो सारा प्रसंग बिसु महाराण्याच्या मनांत पुन्हा जिवंत झाला. एवढ्या शकुनी मुलाचें बारा वर्षांनीं त्यास दर्शन घडत होतें. बिसु महाराण्याचें सारें पितृवात्सल्य उचंबळून आलें. शेकडों मैल अंतर पायीं तुडवून मुलगा त्यास येऊन भेटला होता.

एवढ्यांत मुलानें विचारलें, “ बाबा, तुम्ही घरीं कधीं येणार ? आई तुमची किती व्याकुळतेनें वाट पहाते आहे. ओळख पटावी म्हणून तिनेंच हीं बोरें दिलीं. तिनें तुम्हांस निरोप पाठविला आहे कीं, ‘ तुम्ही घरीं येईपर्यंत मी म्हातारी होणार काय ? ’ ”

मुलाच्या तोंडून आपल्या परमप्रियेची करुण हृद्व्यवस्था समजतांच विशाल स्थापत्याप्रमाणें असलेलें बिसु महाराण्याचें हृदयहि पिळवटून निघालें — हादरून गेलें.

मुलास घेऊन नि:शब्दपणें तो आपल्या विश्रामस्थानीं आला. तोंवर त्यानें बाहेर फुटूं पहाणाऱ्या हृदयावेगास सांवरलें. मुलाच्या दृष्टीस दृष्टि न भिडवितां तो म्हणाला, “ बाळ, राजाज्ञा आहे कीं, मंदिरावर कळस चढल्याखेरीज कोणीं घरीं जावयाचें नाहीं. ”

“ म्हणजे एक-दोन दिवसच ना ! ” धर्मपालानें विचारलें.

“ ईश्वर जाणें ! — कदाचित् कधींच नाहीं ! ”

“ म्हणजे ? ”

“ म्हणजे असें कीं, मंदिरावर कलश चढविण्याचे सर्व उपाय थकले आहेत. नवा योग्य उपाय मला आणि कोणालाच सुचत नाहीं. उपाय नच मिळाला तर आम्हां साऱ्यांनाच ‘अपयशी’ म्हणून लांछन लादून कंठस्थान घातलें जाईल ! ”

यावर कांहीं उत्तर देण्यास धर्मपाल तेथें थांबलाच नाहीं. तो तीरासारखा मंदिराकडे धांवला. पाठोपाठच आलेल्या पित्याकडून त्यानें

मंदिराची सारी रचना समजून घेतली. घडविलेला कलश पाहिला, मापें-वजन सर्व कांहीं समजून घेतलें. स्थपतीच्या हाताशीं असणारें मनुष्यबळ आणि साधनसामग्री पाहिली ! हें सारें पहात असतांनाच त्याच्या मनांत कांहीं रचना आकारत होती. आणि मध्येंच हर्षातिरेकानें तो ओरडून म्हणाला, " बाबा, आज रात्रींतूनच मंदिरावर कलश चढेल ! "



दुसऱ्या दिवशीं उत्तुंग सूर्यमंदिरावर सोनेरी सूर्य-किरणांत तो प्रचंड कलश झळकत होता. पण साऱ्या कामगारांच्या समुदायावर आत्मग्लानीची अवकळा दिसत होती. मुख्य स्थपति बिसु महाराणा शोकावेगानें मूर्च्छित पडला होता. " मंदिरावर एका अजाण मुलाच्या उपायानेंच कळस चढू शकला, " हें वृत्त राजास कळलें तर ? बारा वर्षें प्राण ओतून काम करणाऱ्या कलावंतांची केवढी मानखंडना होईल ! आपलें जीवनपुष्प समर्पून त्यांचा सन्मान — आपल्या पित्याचाहि सन्मान आपण राखला पाहिजे. " असा उदात्त विचार करून बारा वर्षांच्या गुणी धर्मपालानें भावनावेगांत आत्महत्या केली होती ! तो सूर्यमंडल भेदून गेला होता !

धर्मपालाच्या बलिदानाची दंतकथा अशी आहे. पण तिचा अन्वय कांहीं वेगळा असूं शकेल काय ? स्थापत्यांतील अशक्य गोष्टी सिद्धीस जाव्यात म्हणून मुलांस बळी देत, असें ऐकिवांत आहे. धर्मपालाचा-मुख्य स्थपतीच्या मुलाचा बळी घेऊन मगच मंदिर पुरें झालें असेल काय ?

## सूर्यमूर्ति आणि सूर्योपासना :

अखेर रथमंदिर पूर्ण झालें व भगवान् सूर्यनारायणाच्या यथाशास्त्र मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली. ती सूर्यमूर्ति कशी होती ?

" सूर्याच्या मूर्तीचे नाक, कपाळ, जंघा, मांड्या, गाल आणि छाती हे अवयव उन्नत असावेत. त्याचा पोशाख उत्तर प्रदेशांतील लोकांसारखा असावा. त्याच्या हातावर कमल, छातीवर माला, कानांत कुंडलें

आणि कमरेवर अव्यंग ( मेखला ) असावी. सूर्याची मुखाकृति पांढऱ्या कमळाच्या गर्भाप्रमाणें सुंदर, चेहरा हंसरा व शांत आणि डोक्यावर रत्नखचित मुकुट असावा. " — अशी सूर्यमूर्ति असण्याबद्दल महान् ज्योतिर्विद् वराहमिहिर ( इ. स. ५५० ) यांनीं आपल्या बृहत्संहिता ग्रंथांत सांगितलेलें होतें.



सूर्यमूर्ति

येथील सूर्यमूर्तीहि यानुसारच घडविलेली असणार. पण आज तिचें येथें दर्शन होत नाहीं. ती मूर्ति आपत्कालीं पुरीस हलविली गेल्याचें सांगतात. पुरीस दाखविण्यांत येणारी मूर्ति या वर्णनाशीं जुळणारी आहे ती द्विभुजमूर्ति उभी असून तिच्या अव्यंग मेखलेचा एक पदर गुडघ्या-पर्यंत मध्यें लोंबत आहे. आसन-पीठाच्या दर्शनी भागावर मध्यें एक व दोहो बाजूंस तीन-तीन असे सात घोडेहि आहेत. मूर्तीचे पाय अनावृत दर्शविलेले नाहींत. पायांतील पादत्राणें उंच बुटांसारखीं दिसतात.

लोंबती अव्यंग मेखला आणि पायांतील विशेष प्रकारचीं पादत्राणें हे सूर्यमूर्तीचे दोन विशेष चिंतनीय आहेत. कोणार्क येथें असलेल्या अन्य. सूर्यप्रतिमांतहि तीं वैशिष्ट्यें दिसून येतात. गुजराथमधील मोढेरा येथेंहि अशाच पद्धतीच्या सूर्यप्रतिमा पहा-वयास मिळतात. सूर्यमूर्तीचे हे विशेष भारतीय सूर्योपासनेचा पर्शियाशीं जडलेला अनुबंध व्यक्त करतात. बृहत्संहितेंत वराहमिहिरानें सूर्यपूजेसाठीं

'मग' ब्राह्मण नियुक्त करण्यास सांगितलेलें आहे. सांबाच्या कथेंताहि त्यानें शकद्वीपाहून 'मग' ब्राह्मण आणल्याचा उल्लेख मिळतो. हे शकद्वीपीय 'मग' ब्राह्मणहि कमरेवर अव्यंग धारण करीत. हे 'मग' ब्राह्मण कोण ? वराहमिहिराच्या कथनानुसार, मिहिर-गोत्रीय सुजिह्व ब्राह्मणाची कन्या निक्षुभा हिला सूर्यापासून 'जरसस्त्र' मुलगा झाला; 'मग' ब्राह्मण या जरसस्त्राचे वंशज होत.

पंडितांच्या मतानुसार जरसस्त्र आणि पार्शी धर्मसंस्थापक झरतुष्ट्र एकच. शकद्वीपीय 'मग' ब्राह्मण म्हणजे प्राचीन पर्शियांतील 'मगी' लोक आणि मगांची किंवा सूर्यमूर्तीची 'अव्यंग' मेखला म्हणजे पर्शियनांची कश्ती किंवा अवेस्ता ग्रंथांत उल्लेखलेली 'ऐव्यओंघेन' होय. पर्शियनांची सूर्योपासना तर विश्वविश्रुतच आहे.

भारतीय सूर्योपासनेचा पर्शियन सूर्योपासनेशीं असा दृढ अनुबंध आहे. पण याचा अर्थ, भारतानें पर्शियनांपासून सूर्योपासना घेतली, असा मात्र करतां येणार नाहीं.

सूर्य ही भारतीयांची वेदोक्त देवता आहे. सूर्यस्तुतिपर कित्येक मंत्र वेदांतून मिळतात. यास्काचार्यांनीं वेदमंत्रांच्या आधारें देवतांचे तीनच प्रकार कल्पिले आणि नैरुक्तांच्या मतें द्युलोकांत सूर्य, अंतरिक्षांत वायु ( वरुण वा इंद्र ) आणि पृथ्वीवर अग्नि या तीनच देवता प्रथम होत्या, असें सांगितलें. गायत्री मंत्र हा तर वेदमंत्रांचा मेरुमणि. त्या गायत्री मंत्रानेंच 'संध्या'-वंदनाच्या वेळीं सूर्यदेवाच्या परमश्रेष्ठ ब्रह्मस्वरूप तेजाचें ध्यान केलें जातें आणि त्यास बुद्धिप्रेरणा देण्यास प्रार्थिलें जातें. त्याच मंत्रानें प्रातिदिन सूर्यनारायणास अर्घ्य दिले जातात. संध्येंतील सूर्योपस्थानाचे मंत्रहि वेदोक्त मंत्र असून ते किती आशयपूर्ण आहेत, हें पुस्तकारंभीं दिलेल्या एका मंत्रानुवादावरून ध्यानीं येईल. अशाच दुसऱ्या मंत्राचा भावार्थ असा —

" पूर्वेस उदय पावणारें सूर्यतेज म्हणजेच जगाचा नेत्र. तें तेज परमशुद्ध आहे, देवांना प्रिय आहे. त्याच्या प्रसादानें वाग्-नेत्र-कर्णादि इंद्रियांची कार्यक्षमता उत्तम राखून आम्ही शंभर वर्षें जिवंत राहूं. शंभर

वर्षेपर्यंत आम्हास दैन्य न येवो. याच्या प्रसादानें शंभर वर्षांहूनहि अधिक काल आम्हांस संपन्न जीवन लाभो. "

सूर्योपासनेच्या वाङ्मयांत वेदोत्तरकालींहि क्रमशः भर पडत गेली. महाभारत, रामायण यांत विविध स्थळीं सूर्यस्तवन येतें. विष्णु, भविष्य, ब्रह्म, अग्नि आणि गरुड हीं पुराणें सूर्योपासनेचा विस्तारानें उद्घोष करीत आहेत. सौरसंहिता तर सूर्याचें गोत्र सांगूनच त्याच्या आराधनेसाठीं अवतीर्ण झाली. कोणार्कच्या सूर्यदेवास विशेषतः ब्रह्म-पुराणाचे अध्यायचे अध्याय वाहिले आहेत. सांब-उपपुराणाचाहि या पुराणांच्याबरोबरच उल्लेख केला पाहिजे.

मंदोसर येथील शिलालेखांतील सूर्यस्तुति इ. सनाच्या पांचव्या शतकांतील सूर्योपासनेवर प्रकाश पाडणारी आहे. सातव्या शतकांत मयूरभट्टानें 'सूर्यशतक' रचलें असल्याचा उल्लेख आधीं येऊन गेलाच आहे.


संध्यावंदनादि विधींनीं सर्वसामान्य स्वरूपांत सूर्योपासना चालू असतांनाच केवळ सूर्य हेंच उपास्य दैवत मानणारा 'सौरां'चाहि एक वर्ग भारतांत होता. त्यांच्याच 'दिवाकर' नांवाच्या प्रमुखाशीं आद्य शंकराचार्यांना वादविवाद करावा लागला होता, असें आनंदगिरींच्या 'शंकरविजया'त सांगितलें आहे.

आज संध्यावंदनाच्या स्वरूपांत जशी सूर्योपासना चालू आहे, तशीच पंचायतन पूजेंतूनाहि ती चालू आहे. बल, वीर्य, तेज आणि दीर्घायुष्य यांच्या प्राप्तीसाठीं सूर्य-नमस्कारांचा घेतला जाणारा व्यायाम सूर्योपासनें-तच समाविष्ट करावयास हवा. राजस्थान, माळवा, व्रज आदि प्रांतांतून आजाहि अपत्यजन्माच्या दहाव्या दिवशीं सूर्याचें पूजन करतात. त्या प्रसंगीं गायिल्या जाणाऱ्या गीतांसाहि 'सूरजजी' असें नांव आहे.

महाराष्ट्रांतील कोंकण विभागांत देखील आजहि कांहीं सूर्यो-पासक घराणीं पहावयास मिळतात. महाराष्ट्र-संस्कृतीचे महान् शिल्पकार श्रीसंत एकनाथ यांच्या घराण्यांतील सूर्योपासना प्रसिद्धच आहे. पंढर-पुरीं श्रीविठ्ठलाची पुनःस्थापना करणारे नाथांचे पणजे भानुदास यांनीं बालपणींच सूर्यकृपा प्राप्त करून आपलें नांव सार्थक केलें होतें. नाथांच्या वडिलांचें 'सूर्यनारायण' नांवाहि भानुदासांनीं त्या दैवताविषयींच्या सादर

श्रद्धेमुळें ठेवलें होतें. पुढें त्या 'सूर्यनारायणा'चा पुत्र एकनाथ याच्या तेजस्वितेमुळेंच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांतील दीर्घ काळोखी रात्र संपूं शकली. महाराष्ट्रधर्माचे प्रणेते स्वामी रामदास यांनींहि पूर्वायुष्यांत कठोर सूर्योपासना करूनच प्रखर आत्मतेज संपादन केलें होतें.

तथापि हें मान्य करावयास हवें कीं, वेदोत्तर काळांत बहुतेक दैवतांच्या उपासना ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या उपासनेंत विलीन झाल्या. सूर्योपासना वैष्णव उपासनेचाच अंश बनली. विष्णु ही आदित्य कुलांतील श्रेष्ठतम देवता मानलेली असल्यानें हें स्वाभाविक असेंच घडलें. "सवितृमंडलमध्यवर्ती नारायणा"चें ध्यान केलें जाऊं लागलें, सूर्यास सूर्यनारायण नांव मिळालें ! कोणार्क-मंदिराची उभारणीहि गंगवंशीय राजांच्या वैष्णव उपासनेचाच भाग मानावयास हवा.



भारतांत मूलत:च असलेल्या सूर्योपासनेस पर्शियनांच्या संपर्कानें पुन: बळ लाभलें असावें व त्यांतून सूर्यमंदिरांची उभारणी झाली असावी. हा संपर्क प्राचीन काळापासून होता, असें सांगतां येतें. सूर्योपासनेस लाभलेल्या या नव तेजामुळें भारताच्या विविध भागांत अनेक सूर्यमंदिरें बांधलीं गेलीं. दशपूर ( माळव्यांतील दशोर ) येथें इ. स. ४३७ मध्यें सूर्यमंदिर बांधलें गेलें. ललितादित्य मुक्तापीडानें काश्मीरांतील मार्तंड-मंदिर उभारलें. मुलतानच्या सूर्यमंदिराचा उल्लेख युवानचंग ( सातवें शतक ) नें, अल्बेरुणी ( अकरावें शतक ) आणि अब्दुल रहमान ( बारावें शतक ) यांनीं केला आहे. सांबाची तीच कथा मुलतानच्या मंदिरासंबंधींहि सांगतात. युवानचंगच्या म्हणण्यानुसार कनोजनजिकहि सूर्यमंदिर होतें. भवभूतीचीं नाटकें जेथें प्रथम रंगभूमीवर आलीं तें कालप्रियनाथाचें मंदिर उज्जयिनीस नसून कनोजजवळ काल्पी येथें होतें आणि तें शिव-मंदिर नसून सूर्यमंदिर होतें, ही गोष्ट म. म. मिराशी यांनीं सिद्ध केली आहे. युवान-

चंगनें त्याच मंदिराचा उल्लेख केलेला असावा. कच्छमध्यें कंथकोट आणि गुजराथमध्यें भिन्नमाल, प्राचीकुंड आणि मोढेरा येथेंहि सूर्यमंदिरें होतीं. ग्वाल्हेरच्या सूर्यमंदिराचाहि उल्लेख करावयास हवा. आज मात्र प्रायः सर्वच सूर्यमंदिरांचे कोणार्कप्रमाणेंच केवळ भग्नावशेष राहिले आहेत. काळ सूर्यदेवाचें नियंत्रण मानीत असला, तरी नियंत्याच्या पाषाणप्रतिमांची त्यानें कदर केलेली दिसत नाहीं! तथापि त्या काळावरहि मात करून ह्या स्थानांनीं सूर्यक्षेत्र म्हणून आपलें माहात्म्य अक्षय राखिलें आहेच!

**क्षेत्रमहिमा :**

**'सान्निध्ये मम पूर्वाह्ने सुतीरे द्रक्ष्यते जनः।'**

— भविष्यपुराण

"पूर्वाह्णीं (प्रातःकाळीं) भक्तजनांस माझें प्रत्यक्ष सान्निध्य सुतीरें कोणार्क येथें प्राप्त होईल," अशी भगवान् सूर्यानेंच ग्वाही दिली आहे! तेव्हां कोणार्क क्षेत्राचा आणखी महिमा काय वर्णावा? रोज सूर्योदयाची वेळ साधून येथें सूर्यार्चना करणें मोटें फलप्रद मानलेलें आहे.

**प्रातर्नमामि खलु तत् सवितुर्वरेण्यं**
**रूपं हि मण्डलमृचोऽथ तनुर्यजूंषि।**
**सामानि यस्य किरणाः प्रभवादिहेतुं**
**ब्रह्माहरात्मकमलक्ष्यमचिन्त्यरूपम् ॥**

[ भगवान् सवितृनारायणाच्या सर्वश्रेष्ठ रूपास मी सुप्रभातीं वंदन करतों. तें रूप अलक्षणीय आणि अचिन्त्य आहे — वेदत्रयीचा त्याच्या ठिकाणींच समावेश होतो: ऋग्वेद हेंच त्याचें मंडल होय, यजुर्वेद म्हणजेच त्याचें शरीर आणि सामवेद म्हणजेच त्याचे किरण होत. उत्पत्ति, स्थिति आणि लय ह्या सृष्टीच्या त्रिविध व्यापारांचें मूलकारणहि भगवान् सूर्यच होय. आणि म्हणूनच विष्णूचाच नव्हे, तर ब्रह्मा आणि महेश यांचाहि सूर्यनारायणांत समावेश होतो. भगवान् सूर्याच्या अशा अचिन्त्यरूपास माझें सुप्रभातीं वंदन असो. ] — यासारखें स्तवन करून 'पापौघशत्रु-भयरोगहर' आणि 'त्रैलोक्यपालनपर' आदित्यनारायणाची प्रातःकाळीं आराधना केल्यास ती इच्छित फल देते, अशी भक्तजनांची श्रद्धा आहे. पण

त्यांताहि रथसप्तमीस सुस्नात आणि शुचिर्भूत होऊन समधात चित्तानें येथील सूर्यनारायणास अर्घ्यदान करणें विशेष पुण्यप्रद मानिलें आहे.

**एवं ददाति यश्चार्घ्यं सप्तम्यां सुसमाहितः !**
**आदित्याय शुचिस्नातः स लभेतेप्सितं फलम् ॥**

— ब्रह्मपुराण


सांबासहि माघ शुद्ध सप्तमीसच येथें प्रथम सूर्यदर्शन झालें होतें. त्यामुळेंच रथसप्तमीस दूरदूरच्या ठिकाणांहून असंख्य भाविक येथें जमा होतात. ते सूर्योदयापूर्वींच दूरच्या सरोवरांत स्नान करतात, तीरावर उभे राहून सागरांतून उमलत वर येणाऱ्या सूर्यबिंबास सश्रद्ध अन्तकरणानें अर्घ्यसमर्पण करून मंदिरांत येतात, नवग्रहांचें पूजन करतात आणि 'भुक्तिमुक्तिफलप्रद' भगवान् कोणादित्याचा जयघोष करीत त्यास प्रणतांजलि अर्पण करतात. यानंतर रथसप्तमीची यात्रा ओसरूं लागते.

**विध्वंसनाची कहाणी :**

आपल्या भावभक्तीचें वैकुंठ धराशायी झालेलें पाहून परत फिरणाऱ्या सूर्योपासकांचीं हृदयें गलबलून जातात. शिल्पसौंदर्याचें हें दिव्य कलागार कोण्या अधमानें फोडलें ? स्थापत्यविद्येचें हें महान् आश्चर्य कुणाच्या पापी नजरेनें दृष्टावलें ? निश्चितपणें कांहीं सांगतां येत नाहीं. वाळूंत खचून कोसळलें म्हणावें, तर कोठेंच कलतेपणा दिसत नाहीं. धरणीकंपानें हादरलें म्हणावें, तर मंदिराच्या फरशीस चिरा नाहींत किंवा भिंतींस उभे तडेहि गेलेले नाहींत.

कोणी सांगतात कीं, मंदिराच्या शिखरावर एक प्रचंड लोहचुंबक होता, त्यामुळें त्या बाजूच्या समुद्रांतून जाणारीं गलबतें मंदिराकडे खेचलीं जाऊन किनाऱ्यावर फुटत. म्हणून एका जहाजावरील मुसलमान खलाशांनीं शिखरावरून तो चुंबक उखडून काढला व मग पुजाऱ्यांनीं सूर्यमूर्ति पुरीस हलविली. यानंतर असें म्हणतात कीं, बंगालच्या सुभेदाराचा बाटगा सेनापति काला पहाड यानें सोळाव्या शतकांत ससैन्य हल्ला करून हें मंदिर फोडलें. जेव्हां त्यास तें पुरें फोडतां येईना, तेव्हां त्यानें शिखर फोडून कलश तेवढा काढून नेला. पुढें अठराव्या शतकांत

मराठ्यांनीं मंदिरासमोरील सुंदर स्तंभ हलवून तो पुरीस जगन्नाथासमोर स्थापन केला. यानंतराहि मंदिराची पडझड होत राहिली. इ. स. १८२२



सूर्यमंदिर (कोणार्क)

आणि १८३७ मध्यें क्रमशः स्टर्लिंग आणि फर्ग्युसन यांनीं हें स्थळ पाहिलें होतें. तेव्हां मंदिराचें विमान १२० फूट उंचीपर्यंत शिखर-रेखेच्या कांहीं भागासहित उभें होतें. म्हणजे मंदिराची फार मोठी पडझड अलिकडच्या काळांतच झाली!

कोणार्कच्या परिसरांत मंदिराच्या विध्वंसनाची एक मोठी सूचक लोककथा सांगण्यांत येते : फार प्राचीन काळीं शुमन्यु नांवाचे महा-तपस्वी मुनि या मंदिराजवळ तपोवनांत रहात होते. त्यांना चंद्रभागा नांवाची मोठी धर्मपरायण सुलक्षणी कन्या होती. शुमन्यूंची आपल्या कन्येवर प्राणांहून अधिक प्रीति होती. भगवान् कोणादित्य आणि जगन्नाथ यांच्या आराधनेनें शुमन्यूंचा परिवार स्वतःस कृतकार्य मानीत असे. परंतु कालांतरानें एका विचित्र घटनेनें शुमन्यूंच्या सुखी जीवनास कायमचें ग्रहण लागलें आणि त्याच ग्रहणांत सूर्यमंदिराचाहि पूर्ण ग्रास घेतला गेला!—

अनुक्रम 3999.८ वि: २५/५/७९
क्रमांक २८२ नों. दि: ८/८/७९

श्रीजगन्नाथाच्या रथयात्रेच्या महोत्सवाची तयारी झाली होती. सुभद्रा भगिनीनें आपल्या भावाच्या या उत्सवासाठीं सर्व देवतांना आमंत्रिलें. सर्व देव-देवता आपापल्या स्थानीं येऊन विराजमान होऊं लागल्या. एवढ्यांत कामदेवाची स्वारी सभामंडपांत आली आणि आपल्या चंचल स्वभावानुसार विशेष चौकशी न करतां सूर्यदेवांच्या आसनावर विराजमान झाली. पण जेव्हां सूर्यदेवांचें आगमन झालें तेव्हां कामदेवानें आपलें आसन व्यापल्याचें पाहून त्यांस मोठा अपमान वाटला आणि त्यांनीं कामदेवांची अत्यंत कठोर शब्दांत निर्भर्त्सना केली. कामदेवासहि अर्थातच ही गोष्ट फार लागली आणि संधि मिळतांच या गोष्टीचा बदला घेण्याचें त्यानें ठरविलें

एके दिवशीं कामदेवास अशी संधि मिळाली. मुनि शुमन्यु यांची रूपवती कन्या चंद्रभागा वयांत आली होती. तिची मूळचीच दिव्य रूप-संपदा तिच्या शुद्धाचरणानें आणि निर्मल उपासनेनें विशेष उठून दिसूं लागली होती. एके दिवशीं नित्याप्रमाणें समुद्रतीरीं उभी राहून ती उगवत्या सूर्यास अर्घ्यांजलि अर्पण करीत होती. कामदेवानें ही संधि साधली आणि आपल्या पुष्पसायकानें तत्क्षणीं सूर्यदेवाचा वेध घेतला. झालें ! आपल्या शुद्ध आराधिकेसंबंधीं सूर्याचें मन प्रणयविद्ध झालें आणि आपला रथ रोखून तो सागरतीरीं चंद्रभागेजवळ येऊन उभा राहिला ! तथापि चंद्रभागेस त्याच्या अंत:करणांतील कुवासना ध्यानीं कशी येणार ? पण जेव्हां सूर्यानें कामोद्दीपक चाळे करण्यास सुरुवात केली, तेव्हां मात्र ती घाबरून पळूं लागली. सूर्याची ती दाहक दृष्टि जणुं तिला भाजून काढूं लागली. अखेर मार्ग न सुचून त्या मुग्धेनें सागरांत उडी घेतली ! दीर्घकाळ दवडून चंद्रभागेच्या मार्गे लागलेला सूर्य निराश होऊन रथा-रोहण करून झपाट्यानें निघून गेला. दिवस संपला तरी आपल्या लाडक्या कन्येचा पत्ता नाहीं, ह्या विचारानें व्याकुळ झालेल्या शुमन्यूनें समाधि लावून कारण समजून घेतलें. कारण समजतांच संतप्त झालेल्या मुनीनें सूर्यदेवाचें भूतलाहून संपूर्ण उच्चाटन होईल म्हणून शाप दिला.

— आणि असें सांगतात कीं, दुसऱ्या दिवशीं, कोणार्कचें सूर्यमंदिर समुद्राच्या लाटांच्या तडाख्यांत उद्ध्वस्त होऊन केवळ वाळूनें व्यापलेलेंच लोकांनीं पाहिलें.

या लोककथेंत येथील चंद्रभागा नदीचें काय झालें आणि सूर्य-मंदिर कसें पडलें, या दोन्ही गोष्टींचें सूचन आहे.

ऋषीची शापवाणी खरी करण्यासाठीं जें दुष्कृत्य करावें लागलें, त्याची समुद्रास आज मात्र खंत वाटत असावी! कारण आतां भगवान् सूर्यनारायण आकाशांत पश्चिमेस उतरणीला लागला कीं कोणादित्याची ही दुर्दशा आठवून पूर्वसागराचें हृदय रोज भडभडून येतें, तो दुःखाचे उसासे सोडूं लागतो आणि त्याचे असंख्य खारे आसू कोणार्क-मंदिराच्या या भग्नावशेषांना भिजवूं पहातात. मग कोणार्कच्या शिल्पांची हृदयव्यस्थाहि अधिकच तीव्र होते. त्यांचीं सुंदर शरीरें आणखीनच खंगूं लागतात. आजहि कोणादित्याच्या विरहानें त्या विजन एकांतांत एकटाच सागर आसू ढाळीत आहे आणि कोणादित्याची दिव्य शिल्पशोभा समरसी झुरणीला लागली आहे.

क्र. ९२१८८



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
३९९९८
क्रमांक २०३